International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 6 July-Aug 2024

# मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषी जीवन

**Dr.Balasaheb Laxman Laware**
Assitant Proffesor, Department of Marathi,S.B.V.P.Samaj,Loknete Balasaheb Thorat Arts,Commerce and Science College Talegaon Dighe ,Tal.Sangamner ,Dist.A.Nagar
**Corresponding Author: Dr.Balasaheb Laxman Laware**
**Email:** lavrebalasaheb97@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13382889**

**घोषवारा:**

ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात सध्या वेगळे वळण घेतलेले दिसून येते. यामध्ये आपल्याला प्रकर्षाने असे जाणवते की, ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक प्रश्न आणि समस्या पुढे आणल्या जात आहेत. त्याचे माध्यम म्हणून कथा, कादंबऱ्या, कविता अश्या काही साहित्य प्रकारांचा वापर केला जातो, असे दिसून येते. १९६० नंतर मराठी साहित्यात जे अनेक प्रवाह निर्माण झाले. त्यात ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात संख्यात्मक व गुणात्मक दृष्टया अतिशय मोलाची भर घातलेली आहे. एक नवा आशय, जीवनाचे नवे क्षेत्र मराठी वाचकांसाठी ग्रामीण साहित्याने खुले करुन दिले. या अर्थाने मराठी साहित्याला समृध्द करण्याचे कार्य ग्रामीण साहित्याने केले आहे. मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा सलग प्रवाह १९२० नंतर आणि ग्रामीण साहित्याची चळवळ १९७५ नंतर निर्माण झालेली असली तरी मध्ययुगीन कालखंडातील महानुभावीय साहित्य, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकारा, संत एकनाथ या संतांचे साहित्य तसेच शाहिरी वाङ्मयातमधूनही ग्रामीण जीवनाच्या अनेक छटा दिसून येतात. तसेच महात्मा फुले यांच्यापासून कसदार असे ग्रामीण जीवनातील समस्या मांडणारे साहित्य लिहिले जात आहे. तेव्हा ग्रामीण साहित्याचे १९२० च्या आधीचा कालखंड, १९२० ते १९७५ या दरम्यानचा कालखंड, १९७५ ते १९९० हर कालखंड १९९० नंतरचा म्हणजे जागतिकीकरण सुरु झाल्यानंतरचा कालखंड असे स्थुलमानाने टप्पे सांगता येतील.

**बीजशब्द:** ग्रामीण साहित्य, लोक, परंपरा, संस्कृती, समाज, अभ्यासक, प्रथा, गावगाडा, बलुतेदार, कुळ, शेती.

**प्रास्ताविक:**

ग्रामीण जीवन आपल्या साहित्यातून मांडणारे पहिले लेखक म्हणून महात्मा फुले यांचा उल्लेख केला जातो. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड', 'गुलामगिरी', 'तृतीय रत्न' हे नाटक आणि 'अखंडा' मधून ग्रामीण भागातील लोकांचे जीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात. ग्रामीण भागातील लोकांचे धर्माच्या आधारे होणारे आर्थिक—सामाजिक शोषण, दारिद्रय व दुष्काळामुळे होणारे त्यांचे हाल याचे अतिशय प्रत्ययकारी व परिणामकारक चित्रण महात्मा फुले यांनी आपल्या साहित्यामधुन केलेले दिसून येते. म्हणूनच नागनाथ कोतापल्ले यांनी "महात्मा फुले यांचे लेखन म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिला—वहिला परंतु सशक्त अविष्कार होय" (ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, नागनाथ कोतापल्ले व इतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) असे म्हटलेले आहे. सदर संशोधनात आपण ग्रामीण साहित्यातील केवळ ग्रामीण कादंवरीतील कृषी जीवन अभ्यासणार आहोत.

**संशोधनाची उदिदष्टये:**

१. मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषी जीवनाचा शोध घेणे.
२. मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेणे.
३. मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलते कृषी जीवन अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्व:**

१. मराठी ग्रामीण साहित्यामुळे ग्रामीण भागातील विविध समस्या समजतात.
२. मराठी ग्रामीण साहित्यामुळे ग्रामीण जीवनाच्या विविध पैलूचा उलगडा होतो.
३. मराठी ग्रामीण साहित्य आणि मराठी प्रमाण भाषा साहित्य यातील फरक समजतो.
४. मराठी ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरुप समजते.

**मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषी जीवन:**

महात्मा फुले यांच्यानंतरचे महत्वाचे लेखक म्हणजे कृष्णराव भालेकर. त्यांनी महात्मा फुल्यांपासून प्रेरणा घेऊन कादंबरी व काव्यलेखन केलेले आहे. त्यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी १८७७ मध्ये 'दीनबंधू' या नियतकालिकामधून प्रकाशित झाली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी १८७७ मध्ये 'दीनबंधू' या नियतकालिकामधून प्रकाशित झाली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी चर्चात्मक स्वरुपाची आहे. गावातील पाटील हा महार, मारवाडी, मुसलमान, ब्राम्हण या व इतर सर्व जातींच्या लोकांची बैठक बोलावतो. या व इतर सर्व जातींच्या लोकांची बैठक बोलावतो. या बैठकीत शेतकऱ्यांचे धर्माच्या आधारे होणारे शोषण, कुलकर्ण्यांकडून होणारी आर्थिक लुबाडणुक, कष्ट करुनही उपासमार, जातीव्यवस्था यासारख्या विषयांवर चर्चा होते, त्याचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. तंत्राच्या बाबतीत ही फसलेली मात्र ग्रामीण कादंबरी लेखनाचा प्रथम प्रयत्न म्हणून उल्लेखनीय अशी कादंबरी आहे.

रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही तंत्रदृष्टया यशस्वी मानली गेलेली ग्रामीण कादंबरी १९०२ साली प्रकाशित झाली. पिराजी पाटील

हा या कादंबरीचा नायक असून दुष्काळामुळे उदध्वस्त झालेल्या गावाची दु:स्थिती, शेतकरी व शेतकऱ्यांच्या झालेल्या वाताहतीची हकीकत तो सांगतो, असे वर्णन या कादंबरीत आहे. दुष्काळात रोगराई, चोरीमारी, प्लेग यामुळे त्रासलेले शेतकरी ख्रिश्चन धर्म स्विकारतात. सरकारी अधिकारी लुबाडणुक करतात. शेतकरी शेतमजुर कष्टकरी उपाशी राहतात तर ब्राम्हण मात्र देवाधर्माच्या नावाने फसवणूक करुन पोटभर खातात, या सर्व गोष्टीविषयी चीड या कादंबरीत व्यक्त झालेली आहे. 'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' या कादंबऱ्या ग्रामीण साहित्याच्या पहिल्या कालखंडातील असून या कादंबऱ्यांच्या आशयाचा अभ्यास केला असता त्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा, त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, या लेखनामागे फुले यांची प्रेरणा असलेली दिसून येते. यानंतर मुकुंदराव पाटील यांनी आपल्या 'दीनमित्र' या नियतकालिकातून कित्येक वर्ष विविध प्रकारचे लेखन करुन ग्रामीण जीवनातील प्रश्नांना मुखर केले. त्यांच्या 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' आणि 'होळीची पोळी' या कादंबऱ्या होय.

१९२० ते १९७५ या कालखंडात ग. त्र्यं. माडखोलकर (चंदनवाडी), र. वा. दिघे (सराई, पाणकळा) वि.द. चिंदरकर (महापूर), ग. ल. ठोकळ (गावगुंड), रामतनय (मोहित्यांची मंजुळा, साखरगोष्टी, प्रमिलाबेन) वि. वा. हडप (गोदाराणी, अन्नदाता उपाशी) हे महत्वाचे कादंबरीकार आहेत. यापैकी माडखोलकर, हडप यांच्यावर गांधीवादाचा प्रभाव दिसून येतो. दिघे हे प्रादेशिक कादंबरीकार मानले जातात. तर 'गावगुंड' ही स्वातंत्र्य आंदोलनावर आधारलेली असून संघर्ष, योगायोग, प्रेम इत्यादी विषय असलेली रोमॅंटिक स्वरुपाची कादंबरी आहे.

कादंबऱ्यामध्ये बा.सी. मर्ढेकर यांच्या 'पाणी', 'तांबडी माती' या कादंबऱ्यामधून धरणामुळे उद्ध्वस्त झालेली गावे आलेली आहेत. श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' (१९५५), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५७), 'माचीवरला बुधा' (१९५८) या कादंबऱ्या प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. विभावरी शिरुरकर यांची 'बळी' (१९५०) ही ग्रामीण भागातील मांग—गारुडी या गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातीच्या उपेक्षित व दरिद्री जगण्याचे चित्रण करणारी अतिशय महत्वाची वास्तववादी स्वरुपाची कादंबरी आहे. व्यंकटेश माडगुळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४) या अतिशय महत्वाच्या कादंबऱ्या आहेत. 'बनगरवाडी' मधून एका खेडयातील धनगर समाजाचे शांत, संत असे जगणे, त्यांच्या रुढी—परंपरा, विविध स्वभाव, गावरीत, संस्कृती, सण—उत्सव इ. चे दर्शन घडते. वास्तववादी कादंबरीलेखनाला १९६० नंतर खऱ्या अर्थाने बहर आला. या कालखंडात ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्यांची पहिली पिढी तयार झाली. विविध स्तरातील या लेखकांनी खेडयातील जगण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असल्याने त्यांच्या कथा—कादंबऱ्यांमधून संपूर्ण ग्रामीण जीवन, शेतकरी, शेतकरी, शेतमजुर, बलुतेदार, दलित, भटके इत्यादी वर्ग, त्यांचे दारिद्र्य, दु:ख यासह साकार झालेले दिसून येते. उध्दव शेळके यांची 'धग' (१९६०), शंकर पाटील यांची 'टारफुला', आण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा', हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६८), माडगूळकर यांची 'वावटळ' (१९६४), ना. धों. महानोर यांची 'गांधारी'(१९७३), आनंद यादव यांची 'गोतावळा' व रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१), मनोहर तल्हार यांची 'माणूस' या वास्तववादी स्वरुपाच्या कादंबऱ्या आहेत.

१९७५ नंतर चंद्रकुमार नलगे, नागनाथ कोत्तापल्ले, उत्तम बंडू तुपे, भास्कर चंदनशिव (जांभळं ढव्ह), वासूदेव मुलाटे (विषवृक्षाच्या मुळया), बाबाराव मुसळे (हाल्या हाल्या दूध दे) असे कितीतरी लेखक ग्रामीण साहित्यात मोलाची भर घालताना तसेच ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांना वाचा फोडताना दिसून येतात.

१९९० नंतरच्या काळात कादंबऱ्यांचे लेखन आपणांस दिसून येते यात विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' (१९९०) ही कादंबरी धरणग्रस्तांच्या समस्येवर आधारलेली आहे. 'ताम्रपट' (१९९४)— रंगनाथ पठारे, 'कळप' (१९९१), 'धिगांणा' (१९९२), 'तणकट' (१९९८) राजन गवस, अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा', 'तहान' (१९९४), 'बारोमास' (२००२)— सदानंद देशमुख, कैलास दौंड — 'कापूसकाळ', 'तुडवण','पाणधुई', कृष्णात खोत—'गावठाण', बाबाराव मुसळे यांच्या 'पखाल' (१९९५), गणेश आपटे यांच्या 'गणगोण', 'चुकार', 'भिरुड' इत्यादी या कालखंडात काही स्त्री कादंबरीकारांनीही कादंबरीलेखन केलेले आहे. त्यात प्रतिमा इंगोले ('बुढाई', 'लळिताचे रंग' 'राहूकेतू', जिमखाना), वैशाली कोल्हे,(अंधातरी), शुभदा मुंजे (पारुल), मधु सावंत, अनुराधा गुरव या स्त्रीलेखिका ग्रामीण वास्तव आपल्या कादंबऱ्यामधून रेखाटताना दिसून येतात.

**निष्कर्ष:**

कादंबरी हा दीर्घ असा वाङ्मय प्रकार असतो. कादंबरीत लेखकाला आपला कथाविषय सविस्तरपणे जीवनातील विविध अंगांना, वास्तवाला सामावून घेत, एक व्यापक असा जीवनपट उभा करता येतो. हे कादंबरी वाङ्मयाचे महत्वाचे वैशिष्टय आहे. १९९० नंतरचे वास्तवही अतिशय गुंतागुंतीचे बनलेले असून त्याचे आकलन सर्वसामान्यांना होऊ शकत नसल्याने त्यांच्यासमोर असंख्य समस्या आ वासून उभ्या आहेत व त्यातून कसा मार्ग काढावा हे सुचत नाहीये. मराठीतील ग्रामीण लेखकांनी या वास्तवाला समजून घेत अतिशय समर्थपणे वास्तवावर आधारित गंभीर अशा कादंबऱ्यांचे लेखन या १९९० नंतरच्या काळात केलेले दिसून येते. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात सध्या वेगळे वळण घेतलेले दिसून येते. यामध्ये आपल्याला प्रकर्षाने असे जाणवते कि, ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक प्रश्न आणि समस्या पुढे आणल्या जात आहेत. त्याचे माध्यम म्हणून कथा, कादंबऱ्या, कविता अशा काही साहित्य प्रकारांचा वापर केला जातो, असे दिसून येते. या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून हे प्रश्न पुढे आणले जातात. किंवा ती साहित्यकृती त्यासाठी जबाबदार ठरते आणि त्याचबरोबर त्या लेखकाचा संघर्ष जर त्या बदलाच्या दृष्टीने असेल तर ते अधिक पुढे येऊन त्यातून जे अन्याय किंवा समस्या पुढे येतात.

**संदर्भ:**


१. ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, नागनाथ कोतापल्ले व इतर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन सप्टेंबर २००१.

२. २.ग्रामीण साहित्य आाणि वास्तव (डॉ. द. ता. भोसले गौरवग्रंथ), संपा. डॉ. कृष्णा इंगोले, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी २०११.

३. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य, (प्रा. डॉ. कैलास सार्वेकर स्मृती—गौरवग्रंथ) संपा. डॉ. लीलावती देवर, डॉ. शारदा मोरे, डॉ राहुल पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, डिसेंबर.

४. ग्रामीण साहित्य चळवळ : प्रेरणा व स्वरुप, डॉ. राजीव यशवंते, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०१०.

५. ग्रामीण साहित्यः एक चिंतन डॉ. द. ता. भोसले, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००९.

६. साठोत्तरी मराठी वाड.मयातील प्रवाह, संपादक. डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००७.